नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक १८/०३/२०२५ (मंगळवार) संध्याकाळ

---

## सोशल मिडीयवर धार्मीक भावना दुखावतील अशा पोस्ट टाकुन जातीय तेढ निर्माण करणाऱ्या आरोपीतांविरूध्द २ गुन्हे नोंद

दिनांक १७/०३/२०२५ नागपुर शहरात हिंदु मुस्लीम जातीय दंगली झाल्याने कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाला होता. सदर घटनेच्या अनुषंगाने मा.पोलीस अधीक्षक श्री हर्ष पोद्दर नागपुर ग्रामीण यांनी सर्व उपविभागिय पोलीस अधिकारी ,सर्व ठाणेदार यांना सतत पेट्रोलींग करून गोपनिय यंत्रणा सतर्क करण्याबाबत आदेशित केले. तसेच सतत सोशल मिडीयावर लक्ष ठेवण्यास सांगितले आहे. त्यानुसार सोशल मिडीयवर धार्मीक भावना दुखावतील अशा पोस्ट टाकुन जातीय तेढ निर्माण करणाऱ्या आरोपीतांविरूध्द खालील प्रमाणे २ गुन्हे नोंद करण्यात आले आहे.

पोलीस स्टेशन खापरखेडा :— आरोपी नामे शहाबाज नासिर खान,वय १९ वर्षे, २. शोएब रियाज खान, वय २१ वर्षे,३. कैफ अहमद सिद्दीकी वय १८ वर्षे,४. सिबतैन अनिस सिद्दीकी, वय १८ वर्षे, ५.तबरेज आलम मोहम्मद बी राहीम, वय २४ वर्षे, सर्व रा चणकापुर वार्ड क्र ६ ता सावनेर जि. नागपुर ६.मोहम्मद शोएब खान मोहम्मद सुलतान रा गरीब नवाज नगर, पिली नदी, नागपुर ७. आकिब मोहम्मद तमली शेख , रा गरीब नवाज नगर, पिली नदी, नागपुर ८. मोहम्मद जिशान लतिफ खान, वय २४ वर्षे रा सिल्लेवाडा, ता सावनेर यांनी इन्स्टाग्राम वर औरंगजेब बाबत पोस्ट टाकुन धार्मीक भावना दुखावतील तसेच जातीया तेढ निर्माण होईल असे स्टेटस ठेवल्याने पोलीस स्टेशन खापरखेडा येथे नमुद आरोपीतांविरूध्द कलम २९९,१९६,३५३ (२),६१(२) भा.न्या.सं अन्वये गुन्हा नोंद करण्याची प्रक्रीया सुरू आहे.

पोलीस स्टेशन कन्हान :— आरोपी नामे अनस शेख वल्द जिब्राईल शेख ,वय २१ वर्षे रा. शिवाजी नगर, कन्हान २. अरशीद शेख वल्द गौस शेख , वय २१ वर्षे,रा शिवाजी

नगर, कन्हान ३. विधीसंघर्षग्रस्त बालक यांनी धार्मीक भावना दुखावतील तसेच जातीया तेढ निर्माण होईल अशा इन्स्टाग्राम वर औरंगजेब बाबत पोस्ट टाकल्याने पोलीस स्टेशन कन्हान येथे नमुद आरोपीतांविरूध्द कलम २९९,१९६,३५३ (२),भा.न्या.सं अन्वये गुन्हा नोंद करण्याची प्रक्रीया सुरू आहे.

## पट्टेदार वाघाची शिकार करणाऱ्या आरोपीतांना करण्यात आले अटक

दिनांक १४/०३/२०२५ रोजी खापा वनपरीक्षेत्र अंतर्गत सिरोंजी ता. सावनेर या गावात भानगाडा नाल्याजवळ एक वाघ मृतावस्थेत मिळुन आला होता. वनविभागाच्या अधिकाऱ्यांनी घटनास्थळावर भेट दिली असता वाघाचे सुळे दात, वाघाचे पंजे आणि वाघाच्या मिशा काढुन नेल्याचे आढळुन आले. प्रथम दर्शनी परीस्थीती बघता विजतारा व बांबुच्या सापळ्यावरुन वाघाची शिकार करण्यात आल्याचे समजल्यावरुन खापा वनपरीक्षेत्र येथे वन गुन्हा क्रं.०४९६३/१२४०२४ अन्वये वन्य प्राणी संरक्षण कायदा नुसार गुन्हा नोंदवुन त्याचा तपास आर.एफ.ओ. श्री आठवले खापा करीत आहेत. मागील वर्षी विजतारा व बांबुच्या खुटीच्या च्या साहीत्यासह घटनास्थळी खापा वनपरीक्षेत्रतील कर्मचारी यांनी खापा जंगलात मध्यप्रदेश येथील एका व्यक्तीला अटक केली होती व तिन व्यक्ती हे जंगलातुन पसार झालो होते.सदरहु झालेली वाघाची शिकार त्याच मागच्या प्रकारच्या पध्दतीप्रमाणेचे झालेली असुन संशयाताची विचारपुस दरम्यान व मागील वर्षा पासुन फरार आरोपीचे शोध मोहीम दरम्यान आरोपी हे मध्यप्रदेशातील अतीदुर्गम पहाडी व जंगल भागात राहत असल्याचे माहीतीवरुन मा.पोलीस अधीक्षक श्री हर्ष पोद्दर नागपुर ग्रामीण यांनी आरोपी शोध कामी विशेष पथक तयार करण्याबाबत आदेशित केले. त्यानुसार श्री.अनिल मस्के, उपविभागीय पोलीस अधीकारी तथा सहा पोलीस अधिक्षक, पोलीस निरीक्षक श्री.विशाल गिरी, पोलीस स्टेशन खापा यांचे मार्गदर्शनाखाली वन विभागाचे आर.एफ.ओ.श्री आठवले यांचे पथक व त्यांचे सोबतीला पोलीस स्टेशन खापाचे पोउपनी जगदीश पालीवाल व सोबत पथकाचे मदतीने मौजा बिछवा पो.स्टे. अर्तंगत खमारपाणी चौकी येथे रवाना होवुन मौजा तोरणी गावात आरोपीचे शोध कामी

सर्च ऑफरेशन राबवने असल्याची माहीती वरीष्ठांना देवुन त्वरीतच मा.पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण यांनी वरीष्ठ स्तरावर मा.पोलीस अधिक्षक ,छिंदवाडा यांना सदर प्रकरणाची माहीती देवुन मौजा बिचवा येथील ठाणेदार श्री मनोज मर्सकोल्हे व खमारपाणी चौकी चे अजयसिंग डोगरा यांना सदरचे ऑपरेशन मध्ये सामील होण्याचे आदेश देवुन मा. उपभागीय पोलीस अधीकारी सावनेर यांचे वेळोवेळी मार्गदर्शनात मौजा तोरणी गावात जावुन सर्च ऑपरेशन राबवुन नामे मानीक कुदरी सिलु ,वय ४८ वर्ष व राजु मानसिंग दरसामा वय ३५ वर्ष यांना ताब्यात घेवुन त्यांना विचारपुस केली असता त्यानी मागील वर्षी खापा वनपरीक्षेत्रातचे अर्तंगत अश्याच प्रकारचे विजतारा व बांबुच्या खुटीच्या साहाय्याने ११,००० के.व्ही.विद्युत वाहीनीवरुन सेंट्रींग ताराचे साहय्याने फासे लावल्याचे सांगतले आहे.त्यामुळे त्यांना ताब्यात घेवुन खापा वनपरीक्षेत्राचे अधीकारी यांनी अधिक विचारपुस केली.

सदर प्रकरणी पोलीस पथक आणि वनविभागाच्या पथकाने संयुक्तीक रित्या अज्ञात आरोपीतांचा शोध घेवुन दिनांक १७/०३/२०२५ रोजी  आरोपी नामे १) पंढरी उकंडराव कुंभरे, वय ४५ वर्षे, रा. सोनपुर ता. सावनेर जि.नागपुर  २) किशोर दौलत भलावी , वय ३२ वर्षे, रा. चोरखैरी, ता. सावनेर जि.नागपुर ३) नंदु शंकर भलावी, ४९ वर्षे, रा. सोनपुर, ता. सावनेर जि.नागपुर  ४) छेदीराम घासीराम ठाकुर, वय ५७ वर्षे, रा. कुकरीकोता, जि. बलोदा बाजार, राज्य छत्तीसगढ यांना अटक केली आहे. नमुद आरोपीतांना आज दिनांक १८/०३/२०२५ रोजी मा. न्यायालयात हजर केले असता मा. न्यायालयाने  दिनांक २०/०३/२०२५ रोजी  पर्यंत  वन कोठडी सुनावली आहे. सदर गुन्हयाचा तपास सुरू आहे.

पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर